


दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217
वर्ष ३ रे अंक : ३१४ वा शनिवार दि ०७ मार्च २०२६ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# अमेरिका रिफंड करणार १५ लाख कोटी, ४५ दिवसांचा रिटर्न कालावधी, भारतालाही होणार फायदा

वृत्तसंस्था/मुंबई

इराणच्या युद्धात दरम्यान ट्रम्प प्रशासनाला दोन मोठे धक्के बसले आहेत. एकतर त्याला युद्धावर मोठा खर्च करावा लागतोय, आणि त्याचबरोबर अवैध ठरवलेले टॅरिफ कमी होण्याबरोबरच आता ४५ दिवसांच्या आत साधारण १५ लाख कोटी रुपये परत करणे आवश्यक आहे. अमेरिकेच्या कस्टम आणि सीमा सुरक्षा विभागाने परतफेडीसाठी एक नवीन प्रणाली विकसित केली आहे, ज्यामुळे संबंधित देशांना एकाचवेळी या पैशांची परतफेड करता येईल. याचा फायदा नंतर भारतीय निर्यातकांनाही होईल. टॅरिफ ५० टक्क्यांपेक्षा कमी होऊन १५ टक्क्यांपर्यंत आला म्हणून हा फायदा होईल. कस्टम आणि सीमा सुरक्षा अधिकारी ब्रँडन लॉर्डने न्यायालयात सादर केलेल्या एका दस्तऐवजात सांगितले की, त्यांची संस्था एक प्रक्रिया विकसित करत आहे ज्याद्वारे जगभरातील व्यापाऱ्यांकडून वसूल करण्यात आलेले टॅरिफ परत केले जातील. ही घोषणा त्या वेळी झाली जेव्हा ३,३०,३०० आयातदारांना सुमारे १६६ अब्ज डॉलर्सचे शुल्क परत करण्यासाठी व्यापक सामंजस्य चौकट तयार करण्यासाठी सरकारी वकिलांनी संघीय व्यापार न्यायाधीशांची भेट घेतली. आयातदारांना कमी दस्तावेज सादर करावे लागतील. लॉर्डने अमेरिकी आंतरराष्ट्रीय व्यापार न्यायालयात दाखल केलेल्या आपल्या निवेदनात सांगितले की, नवीन प्रक्रियेनुसार आयातदारांना फार कमी दस्तावेज जमा करावे लागतील. सरकारी वकील न्यायाधीश रिचर्ड ईटनशी भेटत आहेत, ज्यांच्याकडे सुमारे २,००० खटले आहेत, ज्यामध्ये आणि म सारख्या कंपन्या टॅरिफ परतफेडीसाठी आंदोलन करीत आहेत. न्यायालयाने देखील विभागाला त्यांच्या नवीन प्रणालीला लागू करण्याचा वेळ दिला आहे. रिफंड कसा दिला जाईल यासंदर्भात कस्टम आणि सीमा सुरक्षा विभागाच्या प्रस्तावित प्रणालीनुसार, आयातदारांना च्या ऑटोमेटेड कमर्शियल एनवायरनमेंट () प्रणालीद्वारे एक घोषणा पत्र जमा करेल, ज्यामध्ये तो त्याने किती टॅरिफ दिला आहे ते सांगेन. एजेंसी या दाव्यांची तपासणी करेल आणि नंतर व्याजासहित रिफंड जारी करेल. प्रत्येक आयतदाराला अमेरिकेच्या ट्रेझरी विभागाकडून एकच पेमेंट मिळेल, मग त्याने कितीही वेळाही सामान मागवले असले तरी. ही प्रक्रिया यासाठी तयार केली गेली आहे, जेणेकरून कंपन्यांना रिफंड मिळवण्यासाठी वेगवेगळे खटले दाखल करण्याची आवश्यकता नाही.




भारताचा रिफंडमध्ये वाटा असणार आहे. कारण भारतीय कापड, हिरे- दागिने आणि औषधे निर्मिती क्षेत्रातील कंपन्यांनी गेल्या वर्षात मोठ्या प्रमाणात टॅरिफचा भरणा केला आहे. फेब्रुवारीतील व्यापार करारामुळे टॅरिफ १८ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आला होता. सर्वोच्च न्यायालयाच्या टॅरिफ रद्द करण्याच्या निर्णयानंतर ट्रम्प यांनी भारतासह इतर देशांवर ग्लोबल सरचार्ज लागू केला आहे.

# मविआकडून राज्यसभेसाठी शरद पवार; ५९ वर्षांचा ट्रॅक रेकॉर्ड कायम राहणार?

वृत्तसंस्था/मुंबई

महाविकास आघाडीकडून राज्यसभा निवडणुकीसाठी शरद पवार यांच्या नावावर शिक्कामोर्तब झालं आहे. याबद्दलची घोषणा काँग्रेस नेत्यांच्या उपस्थितीत शरद पवार यांच्या कन्या आणि राष्ट्रवादी काँग्रेस शपच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केली. यावेळी त्यांनी महाविकास आघाडीतील तिन्ही पक्षांचे आभार मानले. राज्यसभा निवडणुकीसाठी अर्ज भरण्याचा उद्या शेवटचा दिवस आहे. शरद पवार रिंगणात उतरल्यानं राज्यसभेची निवडणूक बिनविरोध होण्याची दाट शक्यता आहे. राज्यातील राज्यसभेच्या ७ जागा रिक्त होत आहेत. यातील ४ जागा महाविकास आघाडीच्या आहेत. मविआच्या ४ खासदारांचा कार्यकाळ २ एप्रिलला संपणार आहे. एकूण ७ जागांसाठी १६ मार्चला मतदान होईल. महाविकास आघाडीकडे केवळ १ जागा जिंकण्याइतकं संख्याबळ आहे. मविआत शिवसेना उबाठाचे २०, काँग्रेसचे १६ आणि राष्ट्रवादी शपचे १० आमदार आहेत. त्यांची बेरीज ४६ च्या घरात जाते. राज्यसभेची १ जागा जिंकण्यासाठी ३७ मतांची गरज आहे. काँग्रेस नेत्यांच्या उपस्थितीत खासदार सुप्रिया सुळेंनी शरद पवारांच्या नावाची घोषणा केली. राज्यसभेसाठी शरद पवारांच्या नावाला पाठिंबा दिल्याबद्दल त्यांनी काँग्रेस, शिवसेना उबाठाच्या नेत्यांचे आभार मानले. महाविकास आघाडीतील पक्षांची साथ कायम राहणार आहे. आम्ही पूर्ण ताकदीनं एकमेकांना साथ देऊ. काँग्रेस, शिवसेना उबाठाच्या नेत्यांनी मोठं मन दाखवलं, त्याबद्दल मी त्यांची आभारी आहे, असं सुप्रिया सुळे म्हणाल्या. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, वरिष्ठ नेते विजय वडेट्टीवार, बंटी पाटील यावेळी उपस्थित होते. पण शिवसेना उबाठाचा एकही नेता पत्रकार परिषदेला हजर नव्हता. या गैरहजेरीबद्दल सुळे यांना प्रश्न विचारण्यात आला. त्यावर खासदार संजय राऊत आताच शरद पवारांना सिल्व्हर ओकवर येऊन भेटून गेले. त्यांनी तब्येतीची विचारपूस केली. उद्धव ठाकरेंनी उमेदवारीला पाठिंबा दिला. त्याबद्दल मी त्यांची आभार आहे, असं सुळे म्हणाल्या. शरद पवार निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असल्यानं ही निवडणूक बिनविरोध होण्याची दाट शक्यता आहे. पवारांच्या व्यतिरिक्त अन्य उमेदवार असता, तर भाजप प्रणित महायुतीकडून अतिरिक्त उमेदवार देऊन मविआची मतं फोडली जाण्याची शक्यता होती. विशेषत: काँग्रेस, शिवसेना उबाठाचा उमेदवार रिंगणात असता, तर मतांची फाटाफूट करण्याचे प्रयत्न झाले असते. तशी चर्चा गेल्या आठवड्यापासून सुरु होती.



शरद पवारांच्या संसदीय कारकिर्दीला ५९ वर्षे पूर्ण झाली आहेत. या कालावधीत ते विधानसभा, लोकसभा, राज्यसभेवर अनेकदा निवडून गेले आहेत. विशेष म्हणजे या कालावधीत ते एकही निवडणूक हरलेले नाहीत. ते दोनदा राज्यसभेवर गेले आहेत. दोन्ही वेळा त्यांची निवड बिनविरोध झालेली आहे. त्यामुळे यंदाही पवार हाच ट्रॅक रेकॉर्ड कायम राखणार का, याची उत्सुकता आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

# योजनाचा कणा अंगणवाडी सेविका




तुम्हा सर्वांना आठ मार्च जागतिक महिला दिनाच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा महिलांनी आपल्या अधिकारासाठी केलेल्या संघर्षाची स्मरण करून समानतेसाठी हक्क व अधिकारासाठी आपला लढा दृढ करण्याचा दिवस म्हणून जगभरात आठ मार्च हा महिला दिन म्हणून पाळला जातो

भारतातील महिलांना सर्वप्रथम हक्क प्रदान केले ते भारतीय संविधानाने समानता स्वातंत्र्य व संवाद ही केवळ संविधानातील शब्द नसून स्त्रीच्या जगण्याची मूलभूत तत्वे आहे संविधानाने महिलांना अधिकार दिले पण त्याचा प्रत्यक्ष अनुभव तेव्हाच येईल जेव्हा समाज म्हणून आपण ते अधिकार मान्य करू बाळू आणि त्याच्या संरक्षण करू अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे स्त्रीचा निर्णय स्वातंत्र्याचा सन्मान करणे आणि समानतेसाठी संघटित होणे हाच संविधानाचा खरा अर्थ आहे यातूनच मतदानाचा अधिकार भारत हा जगातील पहिला देश आहे ज्याने स्वातंत्र्य मिळताच सर्व प्रौढ महिलांना मतदानाचा अधिकार दिला ग्रामपंचायत ते लोकसभेपर्यंत निवडणुकीला उभे राहण्याचा हक्कही संविधानाने मिळाला

शिक्षणाचा अधिकार संविधानापूर्वी फक्त श्रीमंत घरातील मोजक्याच मुलींना होता परंतु संविधानानंतर तो सर्व मुलींना मिळायला लागला अशा या मुलींमध्ये आम्ही अंगणवाडी कर्मचारी सुद्धा आहोत शिक्षणाचा एवढा मोठा अधिकार संविधानानेच मिळालेला आहे व त्यामुळे आज समाजात स्वतंत्रपणे वावरण्याचा अधिकार सुद्धा मिळाला ङ्गङ्घये ऋतबा मेरे सर को तेरे संविधान से मिला है ये सन्मान भी मुझे तेरी सविधान से मिला है और को जो मिला है ओ नसीब से मिला है हमे तो मुकद्दर भी तेरे सविधान से मिला हअशा या संविधान निर्मात्याला म्हणजेच डॉ .बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन आज आम्ही अंगणवाडी कर्मचारी संविधानामुळे मानाचे स्थान मिळवून समाजात वावरत आहे विशेष म्हणजे तळागाळापर्यंत कामकाज करून मानाने जगत आहे काहींचे तर यावर उदरनिर्वाह सुद्धा होत आहे शासनाच्या प्रत्येक योजनांना पूर्ण करण्याचे काम हे अंगणवाडी कर्मचाऱ्यांना दिले जाते जणू योजनांचा कणाच अंगणवाडी कर्मचारी बनलेले आहे शासन हे वेगवेगळ्या योजना काढते परंतु त्या पूर्णत्वास नेण्याचे काम अंगणवाडी कर्मचारी करत आहे कुठल्याही कामाला सर्वस्व पणाला लावून काम करून ते पूर्ण करून आपली जिम्मेदारी हे निभवत असतात तसेच नवीन पिढी निर्माण करण्याचे काम हे अंगणवाडी कर्मचाऱ्यांवर असते तब्बल दिवसभरात अंगणवाडी कर्मचारी हे आपले काम करीत असतात पाच ते सहा तास अंगणवाडी केंद्रामध्ये झिरो ते सहा वयोगटातील बालकांना सेवा देण्याचे कार्य यांचे चालू असते. मुलांना पूर्व प्राथमिक शिक्षण देणे वजन उंची घेणे त्यांचे आरोग्य विषयी सेवा देणे तसेच स्वच्छतेविषयी त्यांना सवय लावणे आणि त्यांना शिक्षणातून त्यांची बौद्धिक क्षमता वाढवणे या सर्व बाबी अंगणवाडी कर्मचारी करत असतात तसेच शासनाने त्यांना मोबाईल दिलेला आहे आणि आता सर्वच कामे ऑनलाईन झालेली आहे त्यामुळे ऑनलाइन ची भरपूर कामे त्यांना आलेली आहे कुठलेही प्रशिक्षण न देता असे कुठले क्षेत्र नाही की ज्याचे प्रशिक्षण होत नाही परंतु अंगणवाडीचे असे क्षेत्र आहे की ज्यामध्ये फक्त काम लागल्या जातात आणि अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे कुठलेच प्रशिक्षण होत नाही आणि तुटून या मानधनावर हे कर्मचारी नवनवीन आधुनिक तंत्रज्ञानाच्या गोष्टी स्वतःच शिकत आहे आणि काम पूर्ण करत आहे ऑनलाइन कामाचा एकीकडे बोजा वाढत आहे तसेच ऑफलाईन सुद्धा १६ रजिस्टर मेंटेन करणे आणि मुलांचा सांभाळ करणे गरोदर महिलांना सेवा देणे नवजात शिशुच्या मातांना सेवा देणे आणि झिरो ते सहा वयोगटातील मुलांना सेवा देणे तसेच किशोरवयीन मुली ज्या वयात आलेल्या मुली आहे त्यांच्या सहभाग घेऊन त्यांना योग्य ते मार्गदर्शन करणे या आणि देशातील कुपोषणाचे प्रमाण नष्ट करणे ह्या खूप महत्त्वाच्या बाबी त्या पूर्ण करत आहे आज खऱ्या अर्थाने एवढे महत्त्वाचे काम करून सुद्धा त्यांना तुटून जा मानधनावर हे सर्व करावे लागत आहे सरकार त्यांच्या कामाची कुठेही दखल घेत नाही आणि एकीकडे आपण महिला जागतिक दिन हा मानवत असतो आणि दुसरीकडे अंगणवाडी कर्मचाऱ्यांवर होणाऱ्या अन्यायावर कुणीही लक्ष देत नाही ही बाब फार खेदाची आहे मी आजच्या या दिनी सांगू इच्छिते



की समाजातील महत्त्वाच्या घटकांनी सुद्धा या कर्मचाऱ्यांच्या समस्यांकडे लक्ष द्यावे आणि त्यांचा जो लढा चालू आहे त्याला सुद्धा सहकार्य करावे हे च खरे महिला जागतिक दिनी महिलांचा सन्मान करण्याचा जो योग आहे तो पूर्ण होईल शासन विविध योजना काढते लेक लाडकी लाडकी बहीण इतरही वेगवेगळ्या योजना आहेत त्या राबवण्याचे काम तसेच मतदानाचे काम विविध सर्वे याचे काम हे सर्व अंगणवाडी कर्मचाऱ्यांकडे आलेले असते कामाच्या व्याप वाढलेला असतानाही इतर योजनांचे काम सुद्धा आहे कर्मचारी करत असतात कोरोना काळामध्ये तर कोरोना योद्धा म्हणून खऱ्या अर्थाने अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी काम केलेले आहे कोरोना काळामध्ये रक्ताची नाती सुद्धा ज्यावेळी बोलायला तयार नव्हते भेटायला तयार नव्हते आणि अशावेळी जेव्हा मोठमोठे अधिकारी वर्ग घरून काम करत होते कागदोपत्री काम करत होते अशांना कोरोना योद्धा म्हणून घोषित केले परंतु ज्या खरा कोरोना योद्धा आहेत ज्या घराघरापर्यंत जाऊन ज्यांनी सर्वे केलेला आहे स्वतःच्या मुलाबाळांची जीवाची परवा न करता स्वतःच्या संसाराची पर्वा न करता त्या रेड झोन एरियामध्ये जाऊन स्वतः त्यांनी लोकांच्या आरोग्याविषयी लक्ष देऊन कोरोना पेशंटची काळजी घेतली तसेच त्यांना घरपोच आहार जो मुलांना अंगणवाडी केंद्रामध्ये आहार मिळतो तो आहार त्यांनी घरपोच दिला अशा वेळी जेव्हा लोकांचे खायचे पण वांदे झाले होते अशावेळी त्यांनी सहकार्य केलेले आहे अशा खऱ्या कोरोना योद्धांना सरकारने दुर्लक्षित केलेले आहे आणि कागदोपत्री घरी बसून काम केलेल्या लोकांना कोरोना योद्धा घोषित केलेले आहे प्रत्येक गोष्टीमध्ये हे सरकार अंगणवाडी कर्मचाऱ्यांकडे दुर्लक्ष करते




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# शिंदेंच्या गावात निसर्गोपचार केंद्राची अर्थसंकल्पात घोषणा; 'मानसोपचार केंद्र' म्हणत ठाकरेंचा टोला

**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी राज्याचे अर्थसंकल्प सादर केले. या अर्थसंकल्पात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सातारा जिल्ह्यातील दरेगावात निसर्गोपचार केंद्र सुरु करणार असल्याची घोषणा करण्यात आली. पण या निसर्गोपचार केंद्रावरुन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना टोला लगावला. 'एक बरं झालं की, एका ठिकाणी ते मानसोपचार केंद्र काढत आहेत. त्याची खरंच गरज आहे. सर्वांसाठी नाही. बाकी सगळे हुशार आहेत. पण मानसोपचार केंद्र योग्य ठिकाणी सुरु करत आहेत त्याबद्दल त्यांचं अभिनंदन', असा टोला उद्धव ठाकरे यांनी लगावला. उद्धव ठाकरेंच्या या टीकेला एकनाथ शिंदेंनी देखील एका







वाक्यात उत्तर दिलं. 'आम्ही मानसोपचारही करु, विरोधकांचा ताण तणाव दूर करु', असं प्रत्युत्तर एकनाथ शिंदेंनी दिलं.एक तर वृक्ष का तोडताय? ३०० कोटी वृक्ष लागवडाची घोषणा करताय, पण त्यासाठी जमीन कुठे आहे ते नकाशावर दाखवा. जसं एखाद्या प्रकल्पासाठी तुम्ही जमीन अधिग्रहण करता, शेतकरी किंवा इतर सगळ्यांना उद्ध्वस्त करता. एखादं बंदर असेल तर शेतकऱ्यांना तिथून हुसकावून लावता. तसं वृक्ष लागवडीसाठी जमीन कुठे आहे त आधी नकाशावर दाखवा. तिथे जमिनीसाठी आरक्षण आणणार आहात का? हे सांगा.'काँक्रीटचे रस्ते करताना सिमेंट हे कुणाकडून खरेदी करणार ते उघड आहे. जवळपास ६० ते ७० टक्के सिमेंटचा पुरवठा हा एकाच कंत्राटदाराच्या विविध कंपन्याकडून केला जातो. एवढे रस्ते कुणी मागितले आहेत? या रस्त्याने जायचं कुठे? बुलेट ट्रेनने अहमदाबादला मराठी माणूस जाणार आहे का?निधीसाठी पैसे कुठून आणणार? २०४७ पर्यंत हे सरकार टिकणार नाही. भाजप टिकणार नाही. मग तोपर्यंत कर्जाचा डोंगर राज्यावर लादणार आहेत ते कर्ज फेडणार कोण? कंत्राटदारांसाठी रस्ते आणि महामार्ग आहेत.

तरुणांना नोकरीसाठी काय आहे, अख म्हणजे काय, नेमकं कशात नोकरी मिळणार आहे? याबाबत कुठेही सविस्तर उल्लेख नाही.'मी शेतकऱ्यांना सांगेन हे लबाडा घरचं आवतन आहे. अजूनही त्यांनी २०१७ साली छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने जी कर्जमाफी केली होती ती योजना अजूनही चालू आहे. ती कधी पूर्ण करणार? आम्ही सुरु केली आणि कालबद्ध पद्धतीने पूर्ण केली. आजची योजना कधीपासून सुरु होईल आणि पूर्ण होईल की ती सुद्धा २०४७ पर्यंत सुरु राहील? शेतकऱ्यांचा सात-बारा कोरा करण्याचं आश्वासन कधी पूर्ण होईल?'.

## प्रभाग समिती अध्यक्ष निवडणुकीत श्रद्धा जाधवांचा एका मताने पराभव

**मुंबई :** मुंबई महापालिकेच्या १७ पैकी ६ प्रभाग समिती अध्यक्षपदासाठी गुरुवारी झालेल्या निवडणुकीत तीन प्रभाग समिती अध्यक्षपदी भाजपचे नगरसेवक बिनविरोध निवडून आले. अन्य तीन प्रभाग समित्यांमध्ये, शिवसेनेने एक, तर काँग्रेसने दोन समिती अध्यक्षपदे पटकावली. या सहा प्रभाग समिती अध्यक्षपदाच्या निवडणुकीत पीठासीन अधिकारी म्हणून महापौर रितू तावडे आणि उपमहापौर संजय घाडी यांनी कामकाज पाहिले.चुरशीच्या ठरलेल्या एफ उत्तर व एफ दक्षिण प्रभाग समिती अध्यक्षपदाच्या निवडणुकीत संख्याबळ अधिक असल्याने शिवसेना (उबाठा) पक्षास समिती अध्यक्षपद मिळण्याचा होरा असतानाच ऐनवेळी काँग्रेस आणि समाजवादी पक्षाचे नगरसेवक गैरहजर राहिले. यामुळे 'उबाठा'च्या श्रद्धा जाधव यांचा शिवसेनेच्या उमेदवार मानसी सातमकर यांनी केवळ एका मताने पराभव केला.या निवडणुकीसाठी काँग्रेसने व्हिप जारी केला असतानाही काँग्रेसच्या नगरसेविका आयशा सूफियान वणू, सपच्या इरम सिद्दिकी गैरहजर राहिल्याने मानसी सातमकर यांना भाजपची पाच आणि शिवसेनेची तीन अशी आठ मते मिळाली.





श्रद्धा जाधव यांना 'उबाठा'ची सहा आणि मनसेचे एक अशी सात मते मिळाली. त्याचवेळी, अन्य पाच प्रभाग समित्यांच्या निवडणुकीत, भाजपचे तीन नगरसेवक बिनविरोध निवडून आले असून, काँग्रेस पक्षाचे दोन नगरसेवक अध्यक्षपदी निवडून आले आहेत.आर मध्य आणि आर उत्तर प्रभाग समिती अध्यक्षपदाच्या निवडणुकीत विरोधी पक्षाने एकही उमेदवार न दिल्याने सत्ताधारी भाजपचे नगरसेवक प्रकाश दरेकर यांची बिनविरोध निवड झाली. 'सी' आणि 'डी' प्रभाग समिती अध्यक्षपदाच्या निवडणुकीत भाजपचे उमेदवार आकाश पुरोहित यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची व आर दक्षिण प्रभाग समिती अध्यक्षपदाच्या निवडणुकीत भाजपच्या लीना देहरकर यांची बिनविरोध निवड झाली. पी पूर्व आणि पी पश्चिम प्रभाग समिती अध्यक्षपद निवडणुकीत काँग्रेसचे उमेदवार हैदरअली अस्लम शेख हे १० मते मिळवून निवडून आले.

## विकासाचं मृगजळ दाखवणारा, कर्ज काढून फटाके वाजवणारा अर्थसंकल्प', उद्धव ठाकरेंची अर्थसंकल्पावर टीका

**मुंबई :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी राज्याच्या अर्थसंकल्पावर प्रतिक्रिया दिली. 'विकासाचं मृगजळ दाखवणारा हा अर्थसंकल्प आहे. प्रत्येकाला आता काही दिवसांनी कळेल की, या अर्थसंकल्पाने त्याच्या आयुष्यात काय फरक पडणार आहे. मला असं वाटतं, एकतर राज्याची आर्थिक परिस्थिती कशी आहे हे सर्वजण जाणतात. कर्ज काढून फटाके वाजवणारा हा अर्थसंकल्प आहे. त्यातून मला नाही वाटत राज्याचं काही हीत साधलं जाईल', अशी खोचक टीका उद्धव ठाकरे यांनी केली.आताचे मुख्यमंत्री म्हणताय की, आम्ही शेतकऱ्यांचा सात-बारा करु कोरा. कोरा तर केलेला नाही. पण साधारणत: पाच वर्षांपूर्वी आम्ही कालबद्ध पद्धतीने शेतकऱ्यांची २ लाखांपर्यंतची कर्जमुक्ती केली होती. ही कर्जमाफी कालबद्ध पद्धतीने केल्यानंतर पात्र आणि अपात्र हे असं नियमांचं किंवा अटीतटी ठेवल्या नव्हत्या. फक्त दोन वेळेला शेतकरी त्या केंद्रावर गेल्यानंतर आम्ही शेतकऱ्याची सरसकट कर्जमुक्ती केली होती. दुर्दैवाने त्यानंतर कोरोना आला. त्यामुळे नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपये प्रोत्साहनपर राशी देण्यास सुरुवात केली तेव्हा आमचे सरकार पाडले', असं उद्धव ठाकरे म्हणाले.एकूण अर्थसंकल्प पाहिला तर सात-बारा कोरा झालेला नाहीच. लाडक्या बहिणींचे जे भरीव २१०० रुपये दर महिना आर्थिक मदत देणार होते त्याचा कुठेही उल्लेख नाही. कंत्राटदारांसाठी मात्र ठोस योजना आहेत. प्रत्येक ठिकाणी कुठून कुठे मार्ग होणार आहे, कंत्राटदारांसाठी हा ठोस योजना आहेत. पण शेतकरी आणि कामगारांसाठी हा फसवा अर्थसंकल्प आहे', अशी टीका उद्धव ठाकरेंनी केली.शेतकऱ्यांचं खरंच भलं करायचं असेल तर पात्र, अपात्र हा जो काही शाब्दिक खेळ केलेला




आहे, तसा न करता, ज्याप्रमाणे आम्ही कालबद्ध पद्धतीने शेतकऱ्याला २ लाखांपर्यंत कर्जमुक्त केलं होतं, तसे त्यांनी किती तारखेपर्यंत २ सप्टेंबर म्हटलं आहे, पण आमच्या सरकार येण्याआधीची जी योजना त्यांनी जाहीर केली होती ती अजून सुरु आहे. अर्थसंकल्पात वारंवार २०४७ चा उल्लेख झाला. आताची कर्जमाफी २०४७ पर्यंत तरी पूर्ण करणार का? हे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट शब्दांत सांगावं. कर्जमाफी कोणत्या तारखेपर्यंत पूर्ण करु ते मुख्यमंत्र्यांनी सांगावं', असं उद्धव ठाकरेंनी आवाहन केलं.'या अर्थसंकल्पात थापांची लेव्हल वाढली आहे. थापांचे उन्नत महामार्ग झाले आहेत. २०४७ कुणी बघितला आहे. अहो, आता शेतकरी, मध्यमवर्गीय, नोकरदार, नवे तरुण-तरुणी नोकरीच्या शोधात जाणार आहेत त्यांना काय मिळणार आहे, योजना जाहीर केल्या आहेत त्या योजनांचा पाठपुरावा कधी करणार, त्या योजना पूर्ण कशा होणार? जाहीर केलेल्या योजनांसाठी निधी कुठून आणणार? या अर्थसंकल्पात ठोस असं काहीच नाही', अशी खोचक टीका उद्धव ठाकरे यांनी केली.

## वाघमारेंना उमेदवारी; कीर्तिकर-शेवाळेंना मागे टाकत तिकीट

**मुंबई :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेने धक्कातंत्राचा अवलंब करत प्रवक्त्या ज्योती वाघमारे यांना राज्यसभेची उमेदवारी दिली आहे. आनंदराव अडसूळ, गजानन कीर्तिकर, राहुल शेवाळे, शायना एनसी अशा पक्षातील दिग्गज नेत्यांची नावं स्पर्धेत असताना तुलनेने नवख्या ज्योती वाघमारे यांच्या गळ्यात राज्यसभेच्या उमेदवारीची माळ पडली आहे. उमेदवारी अर्ज भरण्याच्या अखेरच्या दिवशी वाघमारेंच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आलं. ज्योती वाघमारे यांची थेट संसदेच्या वरिष्ठ सभागृहात वर्णी लागल्याने राजकीय वतुर्ळात आश्चर्य व्यक्त केले जात आहे.



सोलापूरच्या सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील अभ्यासू आणि आक्रमक व्यक्तिमत्व म्हणून डॉ. ज्योती वाघमारे यांची ओळख निर्माण केली आहे. उच्च शिक्षणाच्या जोरावर समाजकारणात ठसा उमटवणाऱ्या वाघमारे या शिवसेना पक्षाच्या मुख्य प्रवक्त्या म्हणून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचल्या आहेत.दहावीत ८४ टक्के गुण मिळवल्यानंतर ज्योती वाघमारे यांनी बारावीत पुणे विभागातून मागासवर्गीय विद्यार्थ्यांमध्ये प्रथम येण्याचा मान पटकावला होता. इंग्रजी साहित्यात पीएचडी मिळवलेल्या ज्योती वाघमारे यांना महिलांच्या प्रश्नांवरील संशोधनासाठी राज्यस्तरीय पुरस्कारही मिळाला आहे. त्यांचं मराठी, हिंदी, इंग्रजी यासह तेलगू आणि कन्नड अशा पाच भाषांवर प्रभुत्व आहे.अधिव्याख्याता म्हणून दहा वर्षांहून अधिक काळ कामाचा अनुभव असलेल्या ज्योती वाघमारेंनी आपल्या कार्याची सुरुवात मानवी हक्क अभियान, विद्रोही सांस्कृतिक चळवळ आणि आंबेडकरी चळवळीतून केली. काही काळ त्यांनी वृत्त निवेदिका म्हणूनही काम केलं आहे.. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज आणि महात्मा बसवेश्वर यांचे विचार जनमानसापर्यंत पोहचवण्यासाठी त्यांनी महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्र प्रदेशातही व्याख्यानं दिली आहेत.ज्योती वाघमारे यांचे वडील नागनाथ वाघमारे हे दलित पँथरचे सक्रिय कार्यकर्ते होते. कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी त्यांनी हॉटेलमध्ये वेटर आणि बांधकाम मजूर म्हणूनही काम केलं आहे. त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत सोलापूरच्या जनतेने त्यांना नगरसेवक म्हणून निवडून दिलं होतं. वडिलांच्या सामाजिक कार्याचा वारसा ज्योती वाघमारेंनी पुढे चालवला.

# बारामतीत लॉजवर पोलिसांचा छापा, देहव्यापार रॅकेटवर कारवाई; चार मुलींची सुटका..!



**बारामती (पुणे) :** पुण्यातील बारामती तालुका पोलिसांनी भिगवण रोडवरील प्रणव लॉजवर छापा टाकत देहव्यापाराच्या अड्ड्यावर मोठी कारवाई केली. या कारवाईत पाच जणांना ताब्यात घेण्यात आले असून चार महिलांची सुटका करण्यात आली आहे. सहा आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी महिलांना पैशांचे आमिष दाखवून त्यांच्याकडून देहव्यापार करून घेत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

पोलीस उपनिरीक्षक धनश्री भगत यांनी याबाबत बारामती तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार आरोपी सोमनाथ महादेव खोमणे (रा. सावळ, ता. बारामती), धिरज रामभाऊ जाधव (रा.जालना), सागर संजय सोडबुके ( रा. बारामती), मेराजुल जानीफ अली (रा.गोलपारा,आसाम) अफजल मझीबर रहमान हुसेन (रा.बरपेटा, आसाम) आणि सदाम जुमरुद्दीन हुसेन (रा.बरपेटा,आसाम) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.५ मार्च गुरुवारी रोजी सायंकाळी भिगवण रोडवरील प्रणव लॉज येथे ही कारवाई करण्यात आली. आरोपींनी परराज्यातील महिलांना पैशांचे आमिष दाखवून त्यांच्याकडून वेश्याव्यवसाय करून घेत त्यातून मिळणाऱ्या पैशांवर उपजीविका चालवित असल्याचे पोलिस तपासात उघड झाले आहे. या कारवाईत पोलिसांनी आसाम येथील रहिवासी असलेल्या तीन वय ३०, वय २१, वय २६, आणि पश्चिम बंगाल येथील एक वय २२ वर्ष अशा चार महिलांची सुटका केली.या प्रकरणी आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १४३ तसेच स्त्रिया व मुली अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम १९५६ अंतर्गत कलम ४ व ५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव हे करत आहेत. या कारवाईमुळे लॉजिंग व्यवसायिकांमध्ये खळबळ उडाली आहे.सायबर गुन्हेगारांकडून 'डिजिटल अरेस्ट'ची भीती दाखवत नागरिकांची मोठ्या प्रमाणात फसवणूक केली जात असल्याचा आणखी एक गंभीर प्रकार बारामतीत उघडकीस आला आहे. या प्रकरणात एका ७४ वर्षीय महिलेची तब्बल ४५ लाख ६० हजार रुपयांची फसवणूक झाल्याची घटना समोर आली आहे.

याबाबत बारामती शहर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक ८३/२०२६ नुसार भा.न्या.सं. कलम ३१८(४), ३१९ तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६(उ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## शेतात पोहोचताच माऊलीच्या डोळ्या समोर पोटच्या गोळ्यानं आयुष्य संपवलं..




**बुलढाणा :** बुलढाण्यात एक हृदयद्रावक घटना समोर आली आहे. आईला अखेरचा कॉल तरुण एका तरुणाने आपली जीवनयात्रा संपवल्याची काळीज पिळवटून टाकणारी घटना बुलढाण्यामध्ये घडली आहे. 'आई...हा अखेरचा फोन आहे', असं म्हणत मुलाने आपल्या जन्मदातीला कॉल केला अनब गळफास घेत आयुष्य संपवलं. ज्ञानेश्वर एकनाथ सपकाळ (वय ३९) असं आत्महत्या केलेल्या तरुणाचं नाव आहे. या काळीज पिळवटून टाकणाऱ्या घटनेने संपूर्ण जिल्ह्यात हळहळ व्यक्त होत आहे.या घटनेबाबत मिळालेल्या माहितीनुसार, 'आई...हा माझा तुला शेवटचा फोन आहे' हे ऐकताच पोटचा गोळा काहीतरी विपरीत पाऊल उचलतोय हे लक्षात येताच आई आणि भावाने शेताकडे धाव घेतली. त्यावेळी मोबाइलवर त्यांचं बोलणं सुरूच होतं. पण डोळ्यादेखत आपल्या मुलाला मृत्यूला कवटाळताना पाहण्याची दुर्दैवी वेळ एका माऊलीवर आली. करडी ता. बुलढाणा येथील रहिवासी असलेले मृत ज्ञानेश्वर एकनाथ सपकाळ यांचे धाड येथील भाग १ गट क्र. ५७ मध्ये शेत आहे. २ मार्च सोमवारी रोजी सायंकाळी ७.३० वाजेच्या सुमारास ज्ञानेश्वर यांनी टोकाचं पाऊल उचललं. गळफास घेण्यापूर्वी त्यांनी आपल्या आईला फोन केला आणि हा आपला शेवटचा संवाद असल्याचं सांगितलं.ज्ञानेश्वर यांचा फोन येताच अनर्थ घडणार हे ओळखून त्यांची आई आणि भाऊ तातडीने शेताच्या दिशेने धावले. ते शेतात पोहोचले तेव्हा ज्ञानेश्वर यांचा फोन सुरूच होता. समोरून आई आणि भाऊ येताना दिसताच, ज्ञानेश्वर यांनी आंब्याच्या झाडाला बांधलेल्या नायलॉन दोरीच्या साहाय्याने गळफास घेऊन आपलं आयुष्य. काही क्षणातच त्यांची प्राणज्योत मालवली. आई आणि भावाच्या डोळ्यादेखत हा काळीज पिळवटून टाकणारा प्रकार घडला.या घटनेची माहिती मिळताच धाड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. घटनास्थळी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी धाड येथील ग्रामीण रुग्णालयात रवाना

## कोकणात बंद कारमध्ये तरुणाची बॉडी सापडली

**रत्नागिरी :** रत्नागिरीत एका बंद असलेल्या कारमध्ये तरुणाची बॉडी आढळल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. रत्नागिरी शहरालगत असलेल्या एकदंत नगरकडे जाणाऱ्या फाट्याजवळ एका कारमध्ये शुद्ध हरपलेल्या अवस्थेत ४३ वर्षीय व्यक्ती आढळली होती. वैभव जयप्रकाश सावंतदेसाई (रा. नवेदरवाडी खेडशी, रत्नागिरी) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. या प्रकरणी रत्नागिरी ग्रामीण पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना सोमवार, २ मार्च रोजी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली. एकदंतनगर फाट्याजवळ एक अर्टिगा कार (क्रमांक चक-०८-अछ-८९०४) बराच वेळ उभी होती. कारच्या काचांना बाष्प जमा झाल्याचे पाहून स्थानिक नागरिकांना संशय आला.काही लोकांनी जेव्हा जवळ जाऊन पाहिलं, तेव्हा वैभव सावंतदेसाई हे कारची ड्रायव्हर सीट मागे करुन झोपलेल्या अवस्थेत दिसून आले. नागरिकांनी त्यांना आवाज दिला, मात्र आतून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही.परिस्थितीचं गांभीर्य ओळखून उपस्थित नागरिकांनी गाडीची काच फोडली आणि दरवाजा उघडला.

## कॉलेज विद्यार्थिनीच्या खोलीतच २५ वर्षीय बँक कर्मचाऱ्याने जीव दिला



**श्रीगोंदा :** महाविद्यालयीन तरुणीसमोरच २५ वर्षीय बँक कर्मचारी तरुणाने गळफास घेऊन आयुष्याची अखेर केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा शहरात शिवाजीनगर परिसरात हा प्रकार घडला. ३ मार्च रोजी दुपारी साडेबारा ते एक वाजण्याच्या सुमारास घडलेल्या या घटनेने संपूर्ण शहरात खळबळ उडाली आहे. मात्र त्याने टोकाचं पाऊल का उचललं, त्यामागील कारण अद्याप स्पष्ट झालेलं नाही. सागर सखाराम निंबाळकर (वय २५, रा. श्रीगोंदा स्टेशन) असे जीव दिलेल्या तरुणाचे नाव असून तो जिल्हा सहकारी बँकेत नोकरी करत होता. मंगळवारी दुपारी सागर निंबाळकर हा शिवाजीनगर परिसरातील एका भाड्याच्या खोलीत राहणाऱ्या महाविद्यालयीन तरुणीकडे आला होता.सागर आणि तरुणीत काही वेळ संभाषण झाल्यानंतर दोघांमध्ये अचानक शाब्दिक बाचाबाची झाल्याचे समोर आले आहे. वाद वाढल्यानंतर सागरने अचानक टोकाचे पाऊल उचलत खोलीत असलेल्या कपडे वाळत घालण्याच्या दोरीचा वापर करून तरुणीसमोरच गळफास घेतला. ही घटना तिच्या डोळ्यासमोर घडल्याने ती घाबरून गेली. तिच्या आरडाओरडीनंतर परिसरातील नागरिकांनी धाव घेतली. घटनेची माहिती मिळताच श्रीगोंदा पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. सागरला तत्काळ उपचारासाठी श्रीगोंद्यातील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

मात्र डॉक्टरांनी तपासणी करून त्याला मृत घोषित केले. या घटनेनंतर परिसरात मोठी गर्दी झाली होती.पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून बॉडी शवविच्छेदनासाठी पाठवली आहे. यानंतर मयताचा नातेवाईक किरण तुकाराम निंबाळकर (वय ३५) यांनी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.सागरने जीव देण्यामागे नेमके कारण काय आहे, प्रेमसंबंधातून वाद झाला की इतर काही कारण आहे का, याबाबत शहरात विविध चर्चा सुरू आहेत.

# 'डिजिटल अरेस्ट'ची भीती, वयोवृद्ध महिलेची ४५ लाखांची फसवणूक



**पुणे (बारामती) :** सायबर गुन्हेगारांकडून 'डिजिटल अरेस्ट'ची भीती दाखवत नागरिकांची मोठ्या प्रमाणात फसवणूक केली जात असल्याचा आणखी एक गंभीर प्रकार बारामतीत उघडकीस आला आहे. या प्रकरणात एका ७४ वर्षीय महिलेची तब्बल ४५ लाख ६० हजार रुपयांची फसवणूक झाल्याची घटना समोर आली आहे. याबाबत बारामती शहर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक ८३/२०२६ नुसार भा.न्या. सं. कलम ३१८(४), ३१९ तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६(उ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, शकुंतला उद्धव खर्डे(वय ७४, रा. डोर्लेवाडी, ता. बारामती, जि. पुणे) यांना १४ फेब्रुवारी ते २७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत एका अनोळखी व्यक्तीने मोबाईलवरून व्हॉट्सअप व्हिडिओ कॉल केला. संबंधित इसमाने स्वतःचे नाव संदीप पाटील सांगत तो पोलीस अधिकारी असल्याचं भासवलं. त्याने पोलीस गणवेशात व्हिडिओ कॉल करून विश्वास संपादन केला. यानंतर फिर्यादी यांच्याविरोधात अटक वॉरंट असल्याचं सांगून 'डिजिटल अरेस्ट' होईल अशी भीती दाखवत मानसिक दबाव निर्माण करण्यात आला. या भीतीचा फायदा घेत आरोपीने त्यांना बँकेतील एफडी तोडण्यास भाग पाडले आणि वेगवेगळ्या बँक खात्यांवर पैसे वर्ग करण्यास सांगितलं.फिर्यादी यांनी आरोपीच्या सांगण्यावरून ३४ लाख ६० हजार रुपये आणि ११ लाख रुपये, अशी मिळून एकूण ४५ लाख ६० हजार रुपये विविध बँक खात्यांवर वर्ग केले. काही दिवसांनंतर आरोपीशी संपर्क होत नसल्याने आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी बारामती शहर पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली. या प्रकरणी गुन्हा दाखल करून पोलीस पुढील तपास करत आहेत.बारामती शहर पोलिसांनीनागरिकांना आवाहन केलं आहे की, 'कोणीही स्वतःला पोलीस, सीबीआय, ईडी किंवा न्यायालयाचा अधिकारी असल्याचं सांगून फोन किंवा व्हिडिओ कॉलवर 'डिजिटल अरेस्ट'ची भीती दाखवत असेल तर त्यावर विश्वास ठेवू नये. कोणत्याही परिस्थितीत फोन किंवा व्हिडिओ कॉलवरून पैसे ट्रान्सफर करू नयेत. अशा प्रकारे भीती दाखवून पैसे मागितल्यास राष्ट्रीय सायबर हेल्पलाइन क्रमांक १९३० वर त्वरित संपर्क साधावा. तसेच जवळच्या पोलीस स्टेशनमध्ये प्रत्यक्ष जाऊन तक्रार नोंदवावी. अज्ञात व्यक्तींना ओटीपी, बँक तपशील, वैयक्तिक माहिती किंवा संशयास्पद लिंक देऊ नये'.सायबर फसवणुकीच्या प्रकरणांमध्ये त्वरित तक्रार देणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचं पोलिसांनी स्पष्ट केलं आहे. वेळेत माहिती मिळाल्यास संबंधित बँक खात्यांवरील रक्कम गोठविणे करण्याची कारवाई शक्य होते. अशा प्रकारच्या फसवणुकीपासून स्वतःचे व कुटुंबियांचे संरक्षण करण्यासाठी नागरिकांनी सतर्क राहावे आणि कोणतीही संशयास्पद घटना घडल्यास तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा', असं आवाहन प्रभारी पोलीस निरीक्षक श्रीशैल चिवडशेट्टी यांनी केलं आहे.

# ५ ओव्हरमध्ये ६६ धावांची गरज होती, शेवटच्या ३ ओव्हरमध्ये भारताने विजय कसा खेचून आणला?

**मुंबई/वृत्तसंस्था :** टी २० वर्ल्ड कप सामन्यात भारताने इंग्लंडचा पराभव करत फायनलमध्ये एन्ट्री मारली. भारताने ७ धावांनी विजय मिळवत इंग्लंडचा वर्ल्ड कपमधील प्रवास थांबवला. भारताने दिलेल्या २५० पेक्षा जास्त लक्षाचा पाठलाग करताना इंग्लंडच्या फलंदाजांनी सुरुवातीपासूनच आक्रमक पवित्रा घेतला. इंग्लंडच्या विकेट जात होत्या मात्र रन रेट मध्ये दोन रेट्स कोणताही परिणाम दिसत नव्हता. विकेट गेली तरी प्रत्येकाने भारतीय गोलंदाजांवर आक्रमण सुरू ठेवले होते. यामध्ये एक २२ वर्षाचा पोरगा ज्याने भारताला शेवटच्या ओव्हरपर्यंत झुंजवत ठेवलं होतं. जेकब बेथल याने १०५ धावांची शतकी खेळी करत भारताला अडचणीत आणले होते. दोन जसप्रीत बुमरहाच्या महत्त्वाच्या ओव्हरमुळे सामना फिरला. जर त्या ओव्हरमध्ये धावा जास्त



गेल्या असत्या तर सामन्याचं चित्र पाटलं असतं. त्यामुळे बुमराहला सामनावीर म्हणून गौरवण्यात यायला पाहिजे होतं असं म्हणत चाहत्यांनी नाराजी व्यक्त केली आहे.जसप्रीत बुमराहने सामन्यामध्ये एकूण ४ ओव्हर टाकल्या त्यामध्ये त्याने ३५ धावा देत १ विकेट मिळवली. बुमराहने घेतलेली विकेट ही कॅप्टन हॅरी ब्रूक याची होती. भारताने सामना फक्त सात धावांनी जिंकला. त्यामुळे जर हॅरी टिकला असता तर त्याने सामना पालटवला असता. त्याच्यात तेवढी क्षमता आहे हे सर्वांना माहितच आहे. सुदैवाने हॅरीचा उंच उडालेला झेल अक्षर पटेल याने घेतला आणि भारताला सामन्यात कमबॅक करून दिले.बुमराहने पॉवर प्ले मध्ये गोलंदाजी केली होती. पाचव्या ओव्हरमधील पहिल्याच बॉलवर त्याला विकेट मिळाली होती. एक सिक्स त्याला बसला तरीपण त्याने दबाव न घेता कमबॅक केले. त्या ओव्हरमध्ये फक्त सात धावा दिल्या होत्या. ११ व्या ओव्हरमध्ये त्याने ११ धावा दिल्या, त्यानंतर इंग्लंडला ५ ओव्हरमध्ये ६६ धावांची गरज होती, सूर्याने बुमराहला बोलावलं. १६ व्या ओव्हरमध्ये इंग्लंडच्या फलंदाजांना आक्रमण करण्याची संधी दिली नाही. फक्त आठ धावा दिल्या, या ओव्हरमध्ये त्याने १५ ते २० धावा दिल्या असत्या तर भारतावरच दबाव आला असता.१७ व्या ओव्हरमध्ये अर्शदीपने १७ धावा दिल्या. जेकब बेथल मैदानावर टिकून होता. सूर्याने १८ व्या ओव्हरमध्ये बुमराहकडे चेंडू सोपवला. त्यावेळी १८ चेंडूत ४५ धावांची गरज होती, बुमराहने या ओव्हरमध्ये ६ धावा दिल्याने इंग्लंडवर दबाव वाढला आणि १९ व्या ओव्हरमध्ये १२ चेंडूत ३९ असा सामना झाला होता. हार्दिकच्या ओव्हरमध्ये सॅम करन अक्षरच्या कडक कॅचवर आऊट झाला. तिथेच साम ना फिरला, त्यानेही ९ धावा दिल्या आणि शेवटच्या ओव्हरमध्ये ३० धावा करायच्या होत्या. पण शिवम दुबेकडे चेंडू दिला गेला होता. पहिल्या चेंडूवर दुसरी धाव घेताना जेकब रन आऊट झाला. त्यानंतर आर्चरने सलग तीन षटकार मारले यासह भारताने सामना सात धावांनी जिंकला. त्यामुळे बुमराहने सर्व सामना भारताच्या पारड्यात झुकवून दिला होता. म्हणूनच बुमराहला सामनावीर म्हणून गौरवण्यात यायला हवं होतं असं चाहते बोलत आहे.

## सेमी फायनलचा खरा हिरो कोण ? सॅमसनने चाहत्यांची मन जिंकली

**मुंबई :** टी-२० विश्वचषक उपांत्य सामन्यात भारताने इंग्लंडचा ७ धावांनी पराभव केला. विजयाचा हिरो संजू सॅमसन होता, ज्याने ४२ चेंडूत ८९ धावा केल्या. सॅमसनचं शतक थोडक्यासाठी हुकले. पण सॅमसनच्या या खेळीमुळे भारताचा विजय शक्य झाला आहे. आता सामन्यानंतर संजूने याचे क्रेडिट न घेता मनाचा मोठेपणा दाखवत कोणाला क्रेडिट दिले ते पाहा...सामनावीर म्हणून निवड झाल्यानंतर, डरपक्षीं डरीप म्हणाला, 'जिंकणे चांगले वाटते. गेल्या सामन्यात माझा फॉर्म चांगला होता आणि मी तोच सुरू ठेवण्याचा प्रयत्न केला. मी स्वतःला थोडा वेळ दिला आणि नंतर चेंडू बॅटवर येऊ लागला. मला एक लांब डाव खेळायचा होता. आम्ही परिस्थितीचा अभ्यास घेतला आणि आम्ही यशस्वी झालो हे चांगले आहे. जसप्रीत बुमराहला विजयाचे सर्व श्रेय जाते. जर त्याने चांगली गोलंदाजी केली नसती तर मी कदाचित येथे उभा नसतो. मीही चांगले योगदान दिले आणि त्यासाठी मी खूप आनंदी आहे.'जसप्रीत बुमराहने या सामन्यात



पहिल्याच चेंडूवर भारताला मोठी कामगिरी करून दिली. त्याने पाचव्या षटकाच्या पहिल्याच चेंडूवर हॅरी ब्रूकला बाद केले. इंग्लंडचा कर्णधार चांगल्या फॉर्ममध्ये होता, पण बुमराहच्या स्लोअर चेंडूने तो झेलबाद झाला. जसप्रीत बुमराहने डेथ ओव्हरमध्ये आपली खरी ताकद दाखवली. त्याने १६ व्या षटकात फक्त ८ धावा आणि १८ व्या षटकात फक्त ६ धावा दिल्या. बुमराहच्या गोलंदाजीमुळे इंग्लंडवर दबाव आला आणि शेवटी, बेथेल आणि करन देखील संघाला विजय मिळवून देऊ शकले नाहीत.सेमी फायनल सामन्यात संजूसोबतच शिवम दुबे, हार्दिक पंड्या यांनी स्फोटक खेळली खेळली. अभिषेक शर्मा नेहमीप्रमाणे फ्लॉप राहिला. आता भारतीय संघ फायनल सामन्यात न्यूझीलंडविरुद्ध सामना खेळेल.

## अर्जुन तेंडुलकरची मित्रांनी लग्नातच टेर खेचली

**मुंबई :** मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर यांचा मुलगा आणि युवा क्रिकेटपटू ओीर्क्षीप ढशपर्वीश्रझरी नुकताच विवाहबंधनात अडकला. अर्जुन आणि सानिया चंडोक यांच्या आलिशान विवाह सोहळ्याचे फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर लक्ष वेधून घेत आहेत. मात्र अर्जुन तेंडुलकर काहीसा अंतर्मुख असल्याचं अनेक व्हिडिओंमध्ये पाहायला मिळत आहे. त्यानंतर इंट्रोव्हर्ट मित्राची कळी दोस्तांनी खुलवली आणि अर्जुनलाही हसू आवरता आलं नाही. अर्जुन खरोखर डाऊन टू अर्थ असल्याचंही अनेकांचं म्हणणं आहे. अर्जुन तेंडुलकरचा लग्न समारंभातील एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. या क्लिपमध्ये अर्जुन शांत-शांत, किंबहुना थोडासा गंभीरच दिसतोय, तर लग्नातील पाहुणे मंडळी मात्र हा सोहळा साजरा करत आहेत. त्याच्या संयमी वागणुकीने नेटिझन्सचे लक्ष वेधले आहे. इतक्या आनंदाच्या दिवशी धीरगंभीर दिसण्याबद्दल त्याला खेळकरपणे चिमटे काढण्यास सुरुवात केली आहे. 'स्वतःच्या लग्नातही तो गर्दीपासून पळून जाऊ पाहतोय वाटतं' अशा कमेंट्स आल्या आहेत.

## वरुण चक्रवर्तीला न खेळवण्याची शक्यता, कुलदीपच्या एन्ट्रीचे संकेत


**मुंबई :** वर्ल्ड कप २०२६ च्या दुसऱ्या सेमी फायनल सामन्यामध्ये भारताने इंग्लंडचा सात धावांनी पराभव करत फायनलचे तिकीट पक्के केले. भारतीय खेळाडूंनी केलेल्या सांघिक कामगिरीच्या जोरावर हा विजय मिळवण सोपा झाला. इंग्लंडने शेवटपर्यंत हार मानली नव्हती, भारत सामना गमावतो की काय अशी परिस्थिती निमाण झाली होती. कारण भारताकडे सहाव्या गोलंदाजाचा अद्यापही प्रभावी असा पर्याय उपलब्ध नव्हता. पण प्रमुख फलंदाज आऊट झाल्याने भारताने सरशी साधली. नॉक आऊट सामन्यामध्ये भारताने २५० पेक्षा अधिक धावा करूनही जिंकण्यासाठी फार संघर्ष करावा लागला. मोक्याच्या वेळी भारताचा गोलंदाज जसप्रीत बुमराहने सामना आणखी खेचला पण ज्याला हुकमी एक्का म्हटलं गेलं. तो पूर्णपणे या स्पर्धेत फेल गेलाय. वरूण चक्रवर्ती हा भारताचा प्रमुख स्पिनर आहे. कारण तो खेळत असल्यामुळे कुलदीप यादव हा बाहेर बसलेला आहे. टी२० फॉरमॅटमध्ये रँकिंगमध्ये नंबर वन असलेला वरूण वर्ल्ड कपमध्ये मात्र



मार खाताना दिसत आहे.वरूण चक्रवर्तीने आपल्या ४ ओव्हरमध्ये तब्बल ६४ धावा देत एक विकेट घेतली. महत्त्वाचं म्हणजे भारताचा प्रमुख स्पिनर असलेल्या वरूण चक्रवर्तीला टार्गेट केलं होतं, वरूणच्या ओव्हरमध्ये निर्धाव आणि एकेरी किंवा दुहेरी धाव सोडा चौकार आणि षटकार नाही गेला म्हणजे चांगली ओव्हर पडली असं वाटतं होतं. दुसरा स्पिनर अक्षर पटेल यानेही बॉलिंग केली, त्यालाही एक विकेट मिळाली, पण त्याने ३ ओव्हरमध्ये ३५ धावाच दिल्या. वरूणला बेक्कार फोडला. जेकबने त्याला टार्गेट करून ठेवलं होतं, त्याच्या १३ चेंडूत त्याने ४२ धावा वसूल केल्या. त्यामुळे फायनल सामन्यामध्ये त्याचा अंतिम ११ मध्ये ठेवण्याबाबत टीम मॅनेजमेंट विचार करू शकते.

## सूर्याने सर्वांच कौतुकही केलं, पण मॅचविनरचा उल्लेखही केला नाही

**मुंबई/वृत्तसंस्था :** भारतविरुद्ध इंग्लंड सेमी फायनल सामना रंगला. मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर रंगलेल्या सामन्यात इंग्लंडला ७ धावांनी पराभवचा झटका मिळाला. इंग्लंडने नाणेफेक जिंकून प्रथम बॉलिंग करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना भारतीय संघाने २५३ धावांचा डोंगर उभारला. आता या सामन्यातील विजयानंतर भारतीय कर्णधार डीूरर्ज्ञीरी धरवरर्ली काय विधान केले ते पाहा... सूर्या म्हणाला की, 'मी हॅरीला आत्ताच म्हटलं, तुमच्याविरुद्ध आपल्याला आणखी किती धावा करायच्या आहेत?' शेवटी, ती एक चांगली विकेट होती. पण मी त्यांच्याकडून श्रेय हिरावून घेऊ इच्छित नाही. ते नेहमीच गेममध्ये होते आणि चेजही करण्याचा प्रयत्न करत होते. पण जसप्रीत बुमराह, अर्शदीप सिंग आणि इतर



गोलंदाजांनी ज्या पद्धतीने त्यांच्याकडून खेळ हिरावून घेतला ते अविश्वसनीय होते.'मी खूप घाबरलो होतो. जर कोणी माझ्या हृदयाचे ठोके तपासले असते तर ते सहजपणे १६०-१७० झाले असते. हा एक उत्तम उपांत्य सामना होता, पण आता मी अंतिम फेरीत पोहोचल्याचा आनंद आहे. आम्ही त्या जेतेपदासाठी जात आहोत, पण दबाव असेल. पण खेळाडूही उत्साहित असतील.' भारताच्या क्षेत्ररक्षणाबद्दल: 'अक्षर पटेल हुशार आहेच, पण मी आमचे क्षेत्ररक्षण प्रशिक्षक टी. दिलीप यांनाही काही श्रेय देतोय. खेळाडूंसोबत सराव सत्रासोबत काही मजेशीर सत्रही पार पडतात, ज्याचा खरोखरच चांगला निकाल मिळत आहे.' संजूबद्दल म्हणाला की, 'त्याला काय हवे आहे हे माहित होते. विकेट पडल्यानंतरही, त्याला माहित होते की विकेट फलंदाजीसाठी चांगली आहे.' हार्दिक पंड्याने सामन्यात चांगल्या धावा ही केल्या आणि विकेटही काढल्या तसेच मोक्याच्या क्षणी रनआऊटही केला पण हार्दिकच्या नावाचा उल्लेखही सूर्याने केला नाही.भारतीय संघाने २५३ धावांचा मोठा डोंगर उभारला पण इंग्लंडला काही हे लक्ष्य गाठता आले नाही. भारताने सेमीफायनलचा सामना जिंकला आणि फायनलचे तिकीट पक्के केले. अहमदाबादमध्ये न्यूझीलंडविरुद्ध भारतीय संघ फायनल सामना खेळणार आहे. ८ मार्च रोजी हा फायनल सामना रंगणार आहे. भारतीय संघाकडे फायनल सामना जिंकण्यासाठी फक्त तीन दिवस शिल्लक आहेत.

सेमीफायनल सामन्यात भारताची गोलंदाजी, फलंदाजी आणि सर्वात महत्त्वाचे म्हजे फिल्डिंग ही उत्कृष्ट पाहायला मिळाली. आता फायलन सामन्यातही भारतीय संघ असेच प्रदर्शन करेल आणि पुन्हा एकदा टी-२० विश्वचषकाची ट्रॉफी आपल्या नावावर करेल अशी अपेक्षा चाहत्यांची असणार आहे.

# नताशाने मुलावर उत्तम संस्कार केलेत! अगस्त्यला हार्दिक पांड्याच्या गर्लफ्रेंडसोबत पाहून माही वीजकडून कौतुक



**मुंबई :** भारतीय क्रिकेटपटू हार्दिक पांड्याची एक्स पत्नी, अभिनेत्री नताशा हिचे सध्या सर्वत्र कौतुक होत आहे. सध्या सुरू असलेल्या टी २० सामन्यात हार्दिक पांड्या उत्तम कामगिरी करत आहे. त्याला मैदानात चीअर करण्यासाठी त्याची गर्लफ्रेंड माहिका शर्मा नेहमी उपस्थित असते. पण विशेष म्हणजे तिच्यासोबत हार्दिक आणि नताशाचा मुलगा अगस्त्यसुद्धा असतो. दोघे मिळून स्टेडियमवर हार्दिकचा उत्साह वाढवत असतात..

व्हिडिओ शेअर करताना माही विजने लिहिले आहे की, 'जेव्हा मुलाला प्रेम शिकवले जाते, द्वेष नाही... तेव्हा हे जग किती सुंदर दिसते... नताशा, तू आई म्हणून उत्तम काम करत आहेस.' व्हिडिओमध्ये, माहिका शर्मा स्टँडमध्ये बसलेली दिसते, तिच्यासोबत छोटा अगस्त्य आहे, तो त्याचे वडील हार्दिक पंड्याला मैदानावर क्रिकेट खेळताना पाहून खूप आनंदी दिसत आहे. त्याला चीअर करत आहेया क्लिपमध्ये स्टेडियममधील एक गोड क्षण कैद केला आहे, ज्यामध्ये अगस्त्य खेळ पाहताना आनंदी आहे. यावेळी माहिका अगस्त्यची नीट काळजी घेते, तर अगस्त्य त्याच्या वडिलांच्या एक्स गर्लफ्रेंडसोबत अगदी आरामात असल्याचे या व्हिडिओम ध्ये दिसतेमाही विजने व्हिडिओ रिशेअर केला आहे, ज्यामध्ये मुलाच्या संगोपनात असलेल्या सकारात्मक वातावरणाचे कौतुक केले आहे, जिथे अनावश्यक ड्रामा आणि ताणतणावाशिवाय मुलाचे संगोपन केले जाते. तिने मुलामध्ये रुजवलेल्या प्रेम आणि दयाळूपणाच्या मूल्यांचे कौतुक केले आहेहार्दिक पांड्या आणि नताशा स्टॅन्कोविक यांनी गेल्यावर्षी त्यांच्या विभक्ततेची घोषणा केली होती. त्यांच्यात वैयक्तिक मतभेद असूनही, हे जोडपे त्यांच्या मुलाला, अगस्त्यला पालक म्हणून एकत्र वाढवतात. अलीकडेच हार्दिक पांड्याने त्यांच्या मुलाला सुमारे ३० कोटींची एक लक्झरी कार भेट दिली. दरम्यान, माही विज स्वतः तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे.

## अहान पांडे आणि अनित पड्डा प्रेमात ? अवॉर्डशोमध्ये केलं प्रपोज



**मुंबई :** एखाद्या सिनेमात अभिनेता आणि अभिनेत्रीची जोडी हिट ठरली तर, त्यांच्या अफेअरच्या चर्चाही रंगू लागतात. बॉलिवूडमध्ये हे सगळं काही नवीन नाहीये, आता सैयारा फेम जेन झी कपलच्या रिलेशनशीपची जोरदार चर्चा सुरू आहे.गेल्या काही दिवसांपासून अहान आणि अनितला मुंबईतील रेस्टॉरंट्स आणि एअरपोर्टवर एकत्र स्पॉट करण्यात आलं आहे. सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, 'सैयारा' चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान या दोघांमध्ये जवळीक वाढली होती. तर अहाननं अनितचा वाढदिवस खास पद्धतीनं साजरा केला, ज्याचे फोटो सो शल मीडियावर व्हायरल झाले होते. तेव्हापासूनच अहानने अनितला प्रपोज केल्याच्या चर्चांना उधाण आलं होतं. मात्र नंतर या जोडीच्या ब्रेकअपच्या चर्चाही रंगल्या होत्या. आता मात्र एक व्हिडिओ समोर आला आहे, यात एका अवॉर्ड शोमध्ये अहाननं सगळ्यांसम ोर अनितला प्रपोज केल्याचं पाहायला मिळतं.

***

## घटस्फोटाची केस चालू असताना त्रिशा कृष्णनसोबत खुलेआम फिरतोय विजय थलापती



**मुंबई :** गेले काही दिवस साऊथकडील सुपरस्टार विजय थलापती हा त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. त्याच्या पत्नीने त्याच्यावर विवाहित असूनही परस्त्रीसोबत प्रेमप्रकरण असल्याचे आरोप केल्याचे म्हटले जाते. ती स्त्री म्हणजे अभिनेत्री त्रिशा कृष्णन असल्याचा अनेकांना संशय होता. अशातच ते दोघं ५ मार्च २०२६ रोजी चेन्नई येथे निर्मात्या कल्पना एस सुरेश आणि मीनाक्षी सुरेश यांच्या मुलाच्या लग्नाच्या रिसेप्शनमध्ये एकत्र दिसले.लग्नाच्या रिसेप्शनला उपस्थित राहिल्याचा त्यांचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. डिसेंबर २०२५ मध्ये सुपरस्टार विजयची पत्नी संगीता सोर्नालिंगम यांनी घटस्फोटासाठी अर्ज दाखल केल्यानंतर हा व्हिडिओ समोर आला. तमिळ फिल्म इंडस्ट्रीतील अनेक व्यक्तींनी रिसेप्शनला हजेरी लावली होती, परंतु विजय आणि त्रिशा यांनी एकत्र पोज देऊन सर्वांचे लक्ष वेधून घेतले. सोशल मीडियावर अफेअरच्या अफवांमध्ये विजय आणि त्रिशाचा हा व्हायरल व्हिडिओ सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे.विजय आणि त्रिशा, यांनी अनेक चित्रपटांमध्ये एकत्र काम केले आहे, रिसेप्शनमध्ये दोघेही पारंपारिक पोशाखात खूपच सुंदर दिसत होते. व्हिडिओमध्ये विजय फुलांचा गुच्छ घेऊन उभा आहे, तर अभिनेत्री त्रिशा त्याच्या मागे गाडीतून उतरताना दिसत होती. ते कल्पना सुरेश आणि मीनाक्षीच्या मुलाच्या लग्नाच्या रिसेप्शनमध्ये सहभागी होण्यास गेले २७ फेब्रुवारी रोजी, संगीताचा घटस्फोट अर्ज सोशल मीडियावर व्हायरल झाला, ज्यामध्ये न्यायालयाला त्यांचे २७ वर्षांचे वैवाहिक जीवन संपवण्याची विनंती करण्यात आली होती. चेंगलपट्टू जिल्हा न्यायालयात दाखल केलेल्या अर्जात तिने घटस्फोट मागण्याची कारणे सविस्तरपणे सांगितली. याचिकेत संगीताने विजयवर विवाहबाह्य संबंध असल्याचा आरोप केला. याचिकेत असे उघड झाले की संगीताने ऑगस्ट २०२४ ते फेब्रुवारी २०२५ दरम्यान विजयसोबत नोटिस आणि लेटर पाठवले होते जेणेकरुन त्यांच्या संसारात असलेल्या समस्या सोडवल्या जाऊ शकतील. विजय आणि संगीताने १९९८ मध्ये युनायटेड किंग्डममध्ये लग्न केले आणि १९९९ मध्ये भारतात पुन्हा लग्न केले.



## हातात काम नव्हत तेव्हा मी स्वतःला.. बॉलिवूडमधल्या यशाबद्दल काय म्हणाली तृप्ती डिमरी ?

**मुंबई :** प्रेमाबद्दल प्रत्येकाचा दृष्टिकोन वेगळा असतो. प्रत्येक जण त्याकडे आपापल्या पद्धतीनं पाहतो. मी खऱ्या प्रेमावर विश्वास ठेवते. प्रेम आपल्या प्रत्येकाच्या अंतरंगात असतं. ज्याच्यावर आपण प्रेम करू शकत नाही, त्याच्याबद्दल तिरस्कारही निर्माण होत नाही; कारण प्रेम आणि द्वेष या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. जिथे भावना खोल असतात, तिथेच प्रेमाचा आणि रागाचाही उगम होतो. सर्वांत प्रामाणिक भावना जर कुठली असेल, तर ती प्रेमच, कारण प्रेम असतं तेव्हा आपण खऱ्या अर्थानं जिवंत असतो. आजपर्यंतच्या कलाप्रवासात कलाकार म्हणून तुलापूर्वीची मी आणि आताची मी; याचा विचार केला की जाणवतं; कलाकार म्हणून माझं काम म्हणजे जीवनाचं प्रतिबिंब पडद्यावर उमटवणं. म्हणून मी बदलत राहणं आवश्यक आहे; कारण बदल थांबला, की सर्जनशीलता थांबते. उत्तराखंडमधून दिल्लीत येऊन संघर्ष केला. त्यानंतर तिथून स्वप्ननगरी मुंबईत आले; इथवरच्या प्रत्येक टप्प्यानं मला नव्यानं घडवलं. प्रत्येक सिनेमा, प्रत्येक भूमिका या केवळ करिअरच्या पायऱ्या नव्हत्या, तर आत्मशोधाचा प्रवास होता. एक स्त्री म्हणूनही मी अधिक संयमी, संवेदनशील होत गेले. या प्रवासानं मला शिकवलं, की वंश क्षणिक असतं, पण शिकणं अखंड असतं. उम ेदीच्या दिवसांत मी वर्षाला एखादा सिनेमा करत होते. तीन वर्षांत केवळ तीन सिनेमे केले. मात्र 'ॲनिमल'च्या यशानंतर माझ्याकडे सिनेमांची रांग लागली. २०२४ या एकाच वर्षात मी 'बॅड न्यूज', 'विकी विद्या का वो वाला व्हिडीओ' आणि 'भूलभुलैय्या ३' या सिनेमांमध्ये दिसले. आता 'ओ रोमियो' बरोबरच 'स्पिरिट आणि 'माँ बहन' सारख्या सिनेमांमध्ये काम केलं आहे. प्रत्येक टप्प्यावर नवं काहीतरी शिकण्याचा मी प्रयत्न करतेय.नकार आणि प्रतीक्षेच्या दीर्घ टप्प्यानंतर आज विविधांगी सिनेमांसाठी मला विचारलं जातंय. माझ्यासाठी ही खूप आनंदाची गोष्ट आहे. खरं तर प्रत्येक दुसरा सिनेमा माझ्याकडे यावा, असे मला वाटतं, कारण मी कित्येक 'नकार' हसऱ्या चेहऱ्यानं स्वीकारले आहेत. हातात काम नव्हतं; तेव्हा मी स्वतःला कधी अपयशी मानलं नाही. ऑडिशनला जाण्यातही एक वेगळाच आनंद होता. आजच्या यशाचा आनंद वेगळा आहे. खरं सांगायचं, तर ते दिवस पाहिले नसते, तर कदाचित माझ्या उंचावणाऱ्या करिअरची किंमत मला जाणवली नसती.शाहिदसोबत काम करण्याचा अनुभव समृद्ध करणारा ठरला. त्याच्यातली भावलेली गोष्ट म्हणजे त्याच्या मनात असलेली 'माणुसकी'ची भावनाः जी आजच्या स्पर्धात्मक जगात हळूहळू दुर्मीळ होत चालली आहे. तो केवळ उत्कृष्ट अभिनेता नाही, तर समोरच्याच्या भावना ओळखणारा सहकलाकार आहे. अनेकदा शब्दांचीही गरज भासत नाही; कारण तो न बोलताही मनातलं टिपतो. सेटवर त्याची ऊर्जा, शिस्त आणि एकाग्रता प्रेरणादायी असते, पण त्याहून महत्त्वाचं म्हणजे तो प्रत्येकाचा आदर करतो.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# आयुष्मान भारत व महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत मोफत उपचारासाठी आयुष्मान व वयो वंदना कार्ड आवश्यक

**जनसंचलन/बुलढाणा**


आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना अंतर्गत नागरिकांना मोफत आरोग्य सेवा मिळण्यासाठी आयुष्मान कार्ड तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी वयो वंदना कार्ड असणे आवश्यक आहे. यासाठी पात्र नागरिकांनी योजनेचा लाभ घेण्यासाठी आयुष्मान व वयो वंदना कार्ड तयार करुन घ्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना अंतर्गत राज्यातील सर्व पात्र नागरिकांना लाभ मिळणार असून योजनेंतर्गत २ हजार ३९९ विविध आजारांवर मोफत उपचार उपलब्ध आहेत. ७० वर्षे व त्यापेक्षा अधिक वयाच्या नागरिकांसाठी वयो वंदना कार्ड तयार करण्यात येत आहे. हे कार्ड तयार करण्यासाठी ... या पोर्टलवर जाऊन मफ या लिंकवरून नोंदणी करून कार्ड तयार करता येते. वयो वंदना कार्डसाठी आवश्यक बाबी : नागरिकाचे वय ७० वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक असावे, आधार कार्ड मोबाईल क्रमांकाशी लिंक असणे आवश्यक. आयुष्मान कार्डसाठी आवश्यक बाबी : अद्यावत शिधापत्रिका व १२ अंकी शिधापत्रिका क्रमांक, आधार कार्ड व आधारशी जोडलेला मोबाईल क्रमांक आवश्यक. नागरिकांना सीएससी, आपले सरकार सेवा केंद्र, आशा स्वयंसेविका तसेच रेशन दुकानदार यांच्यामार्फत आयुष्मान व वयो वंदना कार्ड तयार करून घेता येणार आहे. पात्र नागरिकांनी या सुविधेचा लाभ घेऊन मोफत आरोग्य सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# जिल्हा माहिती कार्यालयाचे प्रचार रथ मार्गस्थ; २३० गावांमध्ये पोहोचणार शासनाच्या योजनांची माहिती

**जनसंचलन/बुलढाणा**

शासनाच्या सामाजिक न्याय तसेच शासनाच्या विविध विभागांच्या लोककल्याणाच्या योजनांची माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवणारे चित्ररथाला आज जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून मार्गस्थ करण्यात आले. शासनाच्या लोककल्याणकारी योजनांचा विद्यार्थी व नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी यावेळी केले. हे प्रचाररथ बुलढाणा जिल्ह्याच्या १३ तालुक्यातील २३० गावांमध्ये शासनाच्या योजनांची माहिती पोहोचविणार आहेत. सामाजिक न्याय विभागामार्फत अनुसूचित जाती घटकांसाठी तसेच सामान्य योजनेद्वारे जिल्हा वार्षिक योजनेच्या निधीतून जिल्हा माहिती कार्यालयामार्फत हा उपक्रम राबविला जात आहे. यावेळी उपजिल्हाधिकारी समाधान गायकवाड, जिल्हा नियोजन अधिकारी राहूल पवार, जिल्हा माहिती अधिकारी यासेरोद्दीन काझी, माहिती सहायक सतिश बगमारे तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी आदी उपस्थित होते. सामाजिक न्याय विभागाच्या विशेष घटक योजनेतून विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृहे, विविध शिष्यवृती योजना, आंतरजातीय विवाह प्रोत्साहन, शासकीय पुनर्वसन योजना, राजर्षि शाहू गुणवत्ता पुरस्कार, सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती, आर्थिक सहाय्य योजना, कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण योजना, कन्यादान योजना, स्वाधार योजना इ. तसेच जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजनेंतर्गत कृषी विभाग, महसूल विभाग, जिल्हा कौशल्य विभाग, पुरवठा विभाग अशा विविध विभागाच्या शासनाच्या विविध योजनांची माहिती चित्ररथाच्या माध्यमातून देण्यात येणार आहे. चित्ररथामध्ये असणाऱ्या एलईडी दृकश्राव्य चित्रफितींच्या माध्यमातून व फ्लेक्स बोर्डांद्वारे माहिती दिली जाणार आहे. हे प्रचाररथ जिल्ह्यातील सर्व तालुक्यात प्रामुख्याने ग्रामीण भागात फिरणार आहे. जिल्ह्यातील २३० गावांमधून हे अभियान राबविले जाणार आहे.

# पाणी टंचाई निवारणार्थ बुलढाणा तालुक्यातील तिन गावांसाठी टँकर मंजूर



**जनसंचलन/बुलढाणा**

पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता बुलढाणा तालुक्यातील तिन गावांसाठी पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. यामध्ये पिंपरखेड, वरवंड व सैलानी या ठिकाणी ठरवून दिल्याप्रमाणे टँकरव्दारे पाणी पुरवठा केल्या जाणार आहे, अशी माहिती बुलढाणा उपविभागीय अधिकारी शरद पाटील यांनी दिली.

सैलानी गावाला १५० पशुधन व १००८ लोकसंख्येसाठी एक टँकर २४ हजार ६६० लिटर्स पाणी, पिंपरखेड गावाला ८०० पशुधन व ६८० लोकसंख्येसाठी एक टँकर १३ हजार ६०० लिटर्स पाणी व वरवंड गावाला ९५० पशुधन व ३९७५ लोकसंख्येसाठी एक टँकर ४० हजार लिटर्स पाणी दररोज टँकरव्दारे पुरवठा करेल. पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता या पाच गावांसाठी पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. टँकरने केलेल्या खेपांची ग्रामपंचायतीला नोंद घेण्यात यावी. नोंदवहीची तपासणी नियमितपणे गटविकास अधिकारी यांनी करावी. निवीदाधारकाने टँकर नादुरूस्त झाल्यास त्वरित दुसरे टँकर उपलब्ध करून द्यावे, असे उपविभागीय अधिकारी बुलढाणा यांनी प्रसिद्धीपत्रकाव्दारे कळविले आहे.


## आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

**बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..**



| गुंतवणूक रक्कम | | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | गुंतवणूक कालावधी महिने | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३९१९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

### ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा...
**सुकन्या लक्षाधीश ठेव योजना**



ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे
**सुकन्या लक्षाधीश ठेव योजना**
जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

## दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा
फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४

# जिल्हा माहिती कार्यालयाचे प्रचार रथ मार्गस्थ; २३० गावांमध्ये पोहोचणार शासनाच्या योजनांची माहिती

**जनसंचलन/बुलढाणा**

शासनाच्या सामाजिक न्याय तसेच शासनाच्या विविध विभागांच्या लोककल्याणाच्या योजनांची माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवणारे चित्ररथाला आज जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून मार्गस्थ करण्यात आले. शासनाच्या लोककल्याणकारी योजनांचा विद्यार्थी व नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी यावेळी केले. हे प्रचाररथ बुलढाणा जिल्ह्याच्या १३ तालुक्यातील २३० गावांमध्ये शासनाच्या योजनांची माहिती पोहोचविणार आहेत.सामाजिक न्याय विभागामार्फत अनुसूचित जाती घटकांसाठी तसेच सामान्य योजनेद्वारे जिल्हा वार्षिक योजनेच्या निधीतून जिल्हा माहिती कार्यालयामार्फत हा उपक्रम राबविला जात आहे. यावेळी उपजिल्हाधिकारी समाधान गायकवाड, जिल्हा नियोजन अधिकारी राहूल पवार, जिल्हा माहिती अधिकारी यासेरोद्दीन काझी, माहिती सहायक सतिश बगमारे तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी आदी उपस्थित होते. सामाजिक न्याय विभागाच्या विशेष घटक योजनेतून विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृहे, विविध शिष्यवृत्ती योजना, आंतरजातीय विवाह प्रोत्साहन, शासकीय पुनर्वसन योजना, राजर्षि शाहू गुणवत्ता पुरस्कार, सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती, आर्थिक सहाय्य योजना, कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण योजना, कन्यादान योजना, स्वाधार योजना इ. तसेच जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजनेंतर्गत कृषी विभाग, महसूल विभाग, जिल्हा कौशल्य विभाग, पुरवठा विभाग अशा विविध विभागाच्या शासनाच्या विविध योजनांची माहिती चित्ररथाच्या माध्यमातून देण्यात येणार आहे. चित्ररथामध्ये असणाऱ्या एलईडी दृकश्राव्य चित्रफितींच्या माध्यमातून व फ्लेक्स बोर्डाद्वारे माहिती दिली जाणार आहे. हे प्रचाररथ जिल्ह्यातील सर्व तालुक्यात प्रामुख्याने ग्रामीण भागात फिरणार आहे. जिल्ह्यातील २३० गावांमधून हे अभियान राबविले जाणार आहे.

# माजी सैनिकांच्या पुनर्वसनासाठी स्वयंरोजगार मार्गदर्शन शिबिराचे आयोजन

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यातील माजी सैनिकांच्या पुनर्वसनासाठी विविध स्वयंरोजगार संधींबाबत मार्गदर्शन करण्यासाठी शिबिराचे आयोजन दि. १२ मार्च २०२६ रोजी बुलढाणा येथील सैनिक सभागृह, बस स्टँड समोर येथे करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व माजी सैनिकांनी या सुवर्णसंधीचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तसेच जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर आयोजित करण्यात येणार आहे. माजी सैनिकांना स्वावलंबी बनविणे व त्यांना विविध स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हा या शिबिराचा मुख्य उद्देश असून माजी सैनिकांना विविध स्वयंरोजगार योजना, उद्योग सुरू करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन तसेच उपलब्ध शासकीय योजनांची माहिती देण्यात येणार आहे.

# अमडापूर येथे ८ मार्च रोजी विधी सेवा महाशिबिर व शासकीय योजनांचा महामेळावा

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बुलडाणा, तालुका विधी सेवा समिती व तालुका वकील संघ चिखली, जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा तसेच जिल्हा परिषद बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने चिखली तालुक्यातील जगदंबा बल्लाळ देवी संस्था, अमडापूर येथे दि. ८ मार्च रोजी सकाळी १० वाजता विधी सेवा महाशिबिर, शासकीय सेवा योजनांचा महामेळावा व आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे. या महाशिबिरामध्ये सुमारे ५० शासकीय स्टॉलद्वारे नागरिकांना विविध योजनांची माहिती व लाभ एकाच छताखाली उपलब्ध करून दिला जाणार आहे. यामध्ये आधार कार्ड नोंदणी व दुरुस्ती, संजय गांधी निराधार योजना, आयुष्यमान भारत कार्ड, जात व उत्पन्न दाखले, नवीन रेशन कार्ड तसेच इतर विविध शासकीय सेवा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. याशिवाय नागरिकांना नालसाच्या विविध योजना, लोकअदालत व मध्यस्थीचे फायदे याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तसेच आरोग्य तपासणी शिबिरात डोळ्यांची तपासणी, ओरल कॅन्सर तपासणी, दातांची तपासणी* आदी विविध आजारांची तपासणी केली जाणार आहे. नागरिकांसाठी मोफत कायदेशीर सल्ला व मार्गदर्शन देखील उपलब्ध करून देण्यात येणार आहे. शेतकरी व गरजू नागरिकांनी या महाशिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अध्यक्ष आर. एन. रोकडे यांनी केले आहे.

# खामगाव येथे ९ मार्च रोजी विशेष प्लेसमेंट ड्राइव्हचे आयोजन

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व मॉडेल करिअर सेंटर, बुलढाणा तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज खाजगी आय.टी.आय., खामगाव यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार, दि. ९ मार्च २०२६ रोजी विशेष प्लेसमेंट ड्राइव्हचे आयोजन करण्यात आले आहे. ही प्लेसमेंट ड्राइव्ह राष्ट्रसंत तुकडोजी महाराज खाजगी आय.टी.आय., शेलोडी रोड, खामगाव येथे सकाळी १० वाजता होणार असून या उपक्रमातून नामांकित चिरायू पॉवर लिमिटेड, खामगाव या कंपनीमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या भरती प्रक्रियेत सोलार टेक्निशियन आणि इलेक्ट्रिशियन या ट्रेडमध्ये तांत्रिक प्रशिक्षण पूर्ण केलेल्या उमेदवारांना प्राधान्य दिले जाणार आहे. पात्र उमेदवारांची निवड थेट मुलाखतीद्वारे करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त गरजू व पात्र उमेदवारांनी या प्लेसमेंट ड्राइव्हमध्ये सहभागी होऊन उपलब्ध रोजगार संधींचा लाभ घ्यावा आणि आपल्या करिअरला गती द्यावी, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त गणेश बिटोडे यांनी केले आहे.

# समृद्धी महामार्गावर गॅन्ट्री बसविण्यासाठी वाहतूक तात्पुरती बंद

**जनसंचलन/बुलढाणा**

हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गावर हायवे ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टम अंतर्गत गॅन्ट्री उभारण्याचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत करण्यात येणार आहे. हे काम ८ मार्च ते २७ मार्च २०२६ या कालावधीत १५ टप्प्यांमध्ये करण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे. या कामासाठी बुलढाणा, जालना आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील समृद्धी महामार्गाच्या २९६ किमी ते ५०२.७५२ किमी या दरम्यान गॅन्ट्री उभारण्यात येणार आहेत. बुलढाणा जिल्ह्यातील लोणार, सिंदखेडराजा आणि देऊळगावराजा तालुक्यांमधून तसेच जालना जिल्ह्यातील जालना तालुका आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील छत्रपती संभाजीनगर, गंगापूर व वैजापूर तालुक्यांमधून जाणाऱ्या मार्गावर हे काम होणार आहे. गॅन्ट्री बसविण्याच्या कामादरम्यान संबंधित वाहिनीवरील वाहतूक सुमारे ४५ ते ६० मिनिटांसाठी पूर्णपणे



थांबविण्यात येणार आहे. काम पूर्ण झाल्यानंतर वाहतूक पुन्हा सुरू करण्यात येईल. वाहनचालकांनी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करून सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.




दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८